# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या प्रलंबित मागण्याबाबत

**(१) २६२७६ (१२-०८-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या प्रलंबित मागण्याबाबत मा. शालेय शिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व महासंघाचे पदाधिकारी व विभागीय अधिकारी यांच्या समवेत दिनांक ५//२/२०१४ रोजी बैठक घेण्यात आली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत कोणकोणते निर्णय घेण्यात आले व त्याबाबतची अमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(३) सदर बैठकीतील घेतलेल्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी कोणत्या उपाययोना केल्या आहेत व त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२४-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) या बैठकीत त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू करणे, शिक्षक नियुक्ती मान्यता इ. विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्यात आले असून उक्त निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

---

### राज्यातील रात्र शाळेतील विद्यार्थ्यांना पोषण आहार व शालेय साहित्य विनामूल्य मिळणेबाबत

**(२) २८६२४ (२१-०१-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २१० रात्र शाळेतील सुमारे २१००० विद्यार्थ्यांना पोषण आहार व शालेय

साहित्य शासनातर्फे विन्यामुल्य मिळावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये वा त्यासुमारास मा.शालेय शिक्षण मंत्री महाराष्ट्र राज्य यांना निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रात्र शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने व विदयार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून पोषणआहार व शालेय साहित्य उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-१०-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) रात्रशाळेतील पात्र विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार व मोफत पाठ्यपुस्तके पुरविण्यात येतात.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील शिक्षण संस्थांकडून अनामत रकमा देण्यास टाळाटाळ होत असणेबाबत

**(३) ३२९२५ (२१-०१-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील प्रत्येक शाळा, महाविद्यालय, विद्यार्थ्यांकडून शुल्काव्यतिरिक्त काही अनामत रक्कम घेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अभियांत्रिकी औषधनिर्माण शास्त्र, व्यवस्थापन अशा व्यावसायीक अभ्यासकमांच्या संस्थांमध्ये पारंपारिक अभ्यासक्रमापेक्षा अनामत रक्कम अवाजवी घेतली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एका विद्यार्थ्यांकडून अगदी ५ हजार ते २५ हजार रुपयापर्यंत अनामत रक्कम घेतली जात आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, ग्रंथालय, प्रयोगशाळा, उपक्रम यांच्या नावाखाली शाळेपासून महाविद्यालयापर्यंत घेतल्या जाणाऱ्या अनामत रकमा परत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-११-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे, शाळांबाबत अशी कोणतीही तक्रार नाही. मात्र, व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या काही संस्था विद्यार्थ्यांकडून शुल्काव्यतिरिक्त काही अनामत रक्कम घेत आहेत.
(२) व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थाकडून अभ्यासक्रमनिहाय अनामत रक्कमा सुमारे रुपये ५०००/- ते १००००/-पर्यत घेतल्या जातात.

(३) व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या काही संस्थांमध्ये वसतीगृहांची सुविधा घेत असलेल्या विद्यार्थ्यांव्यतिरिक्त इतर विद्यार्थ्यांकडून सर्वसाधारणत: रुपये १०,०००/- पर्यंत अनामत रक्कम घेतली जाते.

(४) प्रवेशाच्या माहितीपत्रकात दिल्यानुसार विद्यार्थ्याने अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर किंवा प्रवेश रद्द केल्यानंतर पुढील ३ आर्थिक वर्षाच्या आत अनामत रक्कम परत मिळणेबाबत अर्ज करावा लागतो. त्यावेळी विद्यार्थ्यांकडून काही येणे असलेली रक्कम असल्यास ती वाजावट करुन अनामत रक्कम परत दिली जाते.

(५) विद्यार्थ्यांकडून अनामत रक्कम परत मिळणेसाठी अर्ज सादर केला जात नाही. त्यामुळे तीन आर्थिक वर्षानंतर अशा जमा रक्कमा शासकीय संस्थांच्या बाबतीत शासनजमा व खाजगी विनाअनुदानित संस्थांच्या बाबतीत विद्यार्थी सहाय्यता निधीत जमा होतात.

---

**यवतमाळ जिल्हयातील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात व्हेंटीलेटर नसल्याने बाळंतीण झालेल्या एक मातेचा दुदैवी मृत्यू झाल्याबाबत**

**(४) ३५२११ (२०.०१.२०१६). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात व्हेंटीलेटर नसल्याने दोन आठवड्यापूर्वी बाळंतीण झालेल्या एक मातेचा दुदैवी मृत्यू झाला असल्याचे दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील ऑक्सिजन सेंटर युनिट मधुन रुग्णालयातील सर्वच प्रभागात आक्सिजन पोहचविण्या करीता सेंटर ऑक्सिजन मॉनिटरिंग युनिट उभारले आहे मात्र नोझल झिजल्याने ऑक्सिजनची मोठया प्रमाणात गळती होत असल्याने प्रभागा पर्यंत ऑक्सिजन पुरवठा होत नाही, हेही खरे आहे काय,

(२) असल्यास, गंभीर आजाराने ग्रस्त रुग्णांना अनेकदा कृत्रीम श्वसनाची गरज भासत असल्यामुळे त्यांना ऑक्सिजन गळतीमुळे तसेच रुग्णालयातील चारही व्हेंटीलेटर व्यस्त असल्याने रुग्णांची गैरसोय होत असून डॉक्टरांवरही मानसिक ताण पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास सदरील रुग्णालयात व्हेंटिलेटरच्या मशिनी वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६.१०.२०१६) :** (१) हे खरे नाही.

श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथे दाखल झालेल्या सदर रुग्णाचा दिनांक १२.९.२०१५ रोजी झालेला मृत्यू व्हेंटीलेटर अभावामुळे झाला नसून गंभीर आजारामुळे झाला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) सदर संस्थेकरिता व्हेंटीलेटर्स खरेदी करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयात सन २०१४-१५ मध्ये अनधिकृतरित्या सुरु असलेल्या मराठी, उर्दु व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये अनेक विद्यार्थी शिक्षण घेत असल्याबाबत**

**(५) ३५७०९ (२१-०१-२०१६). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयात सन २०१४-१५ मध्ये अनधिकृतरित्या सुरु असलेल्या मराठी, उर्दु व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये जवळ-जवळ ५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे अलिकडेच केलेल्या पाहणीमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

रायगड जिल्हयात एकूण १४ अनधिकृत शाळा आहेत. त्यापैकी ५ शाळांना स्वयं-अर्थ सहायित तत्वावर परवानगी देण्यात आली असून, १ शाळा बंद झाली आहे. उर्वरित शाळा बंद करण्याबाबत आर.टी.ई. ॲक्ट २००९ नुसार शिक्षणाधिकारी, रायगड यांनी गटशिक्षणाधिकारी यांना सदर शाळांवर कारवाई करण्याबाबत सक्त सूचना दिल्या आहेत. त्यानुसार गटशिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु केली असून, सदर शाळांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ऑलिम्पिक पदक विजेत्या खेळाडूंना शासनाकडून देण्यात येणाऱ्या पेन्शनसाठी उत्पन्नाची अट रद्द करण्याची केलेली मागणी**

**(६) ४३२५२ (०६-०५-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील**

**(कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऑलिम्पिक पदक विजेत्या खेळाडूंना राज्य शासनाकडून देण्यात येणाऱ्या पेन्शनसाठी उत्पन्नाची अट लागू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय, असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(२) असल्यास, सदरहू उत्पन्नाची अट रद्द करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या वतीने मा. मुख्यमंत्री महोदयांकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व यावर केव्हा निर्णय घेण्यात येईल ?

**श्री. विनोद तावडे (१५-११-२०१६) :** (१) ऑलिम्पिक पदक विजेत्या खेळांडूना राज्य शासनाकडून पेन्शन अदा करण्यात येत नाही. तथापि महाराष्ट्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अतुलनीय कामगिरी केलेल्या वयोवृध्द खेळाडू तसेच दिनांक ०७.०५.२००७ च्या शासन निर्णयानुसार वयोवृध्द खेळाडूंना मानधन मिळण्यासाठी असणारी उत्पन्नाची मर्यादा वार्षिक रु. ४०,०००/- वरुन वाढवून रु. १,००,०००/- पर्यंत करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वरळी येथील वीर नरीमन मार्गावरील आदर्श नगर येथे जिल्हा क्रीडा संकुल उभारण्याबाबत

**(७) ४४४८९ (०६-०५-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी येथील वीर नरिमन मार्गावरील आदर्श नगर येथे जिल्हा क्रीडा संकुल उभारण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १८ डिसेंबर, २०१५ रोजी निवेदनाद्वारे मा. क्रीडा व युवक कल्याण मंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने वरळी येथे जिल्हा क्रीडा संकुल उभारण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी श्रीमती ज्योस्तना शिंदे यांच्या कारभाराविरोधात करण्यात आलेले धरणे आंदोलन**

**(८) ४४७१२ (१६-०५-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेतवडे (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील शिवपार्वती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष यांनी शिक्षणाधिकारी ज्योस्तना शिंदे यांच्या कारभाराविरोधात विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयासमोर दिनांक १७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) या प्रकरणी आयुक्त शिक्षण, पुणे यांच्या कार्यालयासमोर धरणे आदोलन केले होते. सबब, आयुक्त शिक्षण यांनी या प्रकरणी विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर कडून अहवाल मागविलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सरकारी तसेच अनुदानित शाळांचे मुल्यांकन करण्याच्या नव्या पध्दतीबाबत**

**(९) ४७१५६ (२१-०५-२०१६). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाळांच्या मुल्यांकनाच्या नव्या पध्दतीनुसार मुख्याध्यापकांनाच शाळेत उपलब्ध सोयी सुविधा, विद्‌यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती या आधाराने शाळांचा दर्जा ठरवावा लागणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापुर्वी राज्यात सन १९६८ पासूनची शाळांची मुल्यांकन करण्याची पध्दत अवलंबविण्यात येत होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पध्दत व शासनाने नव्याने सुरु केलेली पध्दत यामध्ये कोणता फरक आहे,

(४) तसेच, शाळेंच्या मुल्यांकनाच्या नव्या पध्दतीनुसार अंमलबजावणीची आतापर्यंतची सद्‌यस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (१५-११-२०१६) :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे महानगरपालिका क्षेत्रातील अल्पसंख्यांकबहुल वस्तीत नागरी सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(१०) ४७८१६ (१३-०५-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. २८, सर्वे नं. ४४४/१अ, अल्पसंख्यांकबहुल वस्तीतील रस्ते-पायवाटा व मलनिस्सारण वाहिन्यांच्या दुरुस्ती बरोबरच अन्य नागरी सोयी-सुविधा प्राधान्याने उपलब्ध करून देण्याबाबत अल्पसंख्यांक विकास निधीतून भरीव आर्थिक मदत प्रत्यार्पित करण्याबाबतची मागणी स्थानिक नगरसेवक अल्पसंख्यांक जनप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री (नगरविकास), मा. राज्यमंत्री (नगरविकास), विभागीय महसूल आयुक्त नाशिक विभाग, जिल्हाधिकारी धुळे, आयुक्त धुळे महानगरपालिका तसेच संबंधित महानगरपालिकेचे उपायुक्त यांच्याकडे दिनांक २८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे (१०-११-२०१६) :** (१) हे खरे नाही,
(२) (अ) प्रस्ताव प्राप्त नसल्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.
(ब) तथापि, सन २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षात अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत धुळे महानगरपालिकेस दिनांक ०१/०१/२०१३ व दिनांक २३/१२/२०१३ च्या शासन निर्णयान्वये अन्य कामांना अनुक्रमे खालील प्रमाणे निधी उपलब्ध करुन दिला आहे :-
(१) मालेगाव रोडवरील जलालशाह कब्रस्तान येथे कुंपन भिंत बांधणे व अंतर्गत रस्ते क्राँक्रीटीकरण करणे, विद्युत व्यवस्था करणे- रु.१९,२२,०००/-
(२) धुळे महानगरपालिका क्षेत्रातील स.न. ४०६/२ मुस्लिम कब्रस्तान, वडजाई येथे अंतर्गत रस्ते बांधणे रु. १९,९९,०००/- इतक्या रक्कमेचे अनुदान वितरित केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शाळांचे मुल्यांकन व पुर्नमुल्यांकन बाबत

**(११) ४९००४ (२५-०५-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कायम विना अनुदानित शाळांचा 'कायम' हा शब्द काढल्यानंतर ज्या शाळांचे मुल्यांकन व पुर्नमुल्यांकन करण्यात आले अशा शाळांची यादी माहे जानेवारी, २०१५ अखेर तयार करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर यादी तयार करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-११-२०१६) :** (१), (२) व (३) शासन निर्णय दिनांक १ जुलै, २०१६ व दिनांक २ जुलै, २०१६ अन्वये मुल्यांकनात पात्र ठरलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना अनुदानास पात्र घोषित करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयासोबत पात्र शाळांची यादी जोडली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शालेय पोषण आहार कर्मचारी संघटनेने त्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी काढलेल्या मोर्चाबाबत

**(१२) ४९०२० (१६-०५-२०१६). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय पोषण आहार कर्मचा-यांच्या संघटनेच्या वतीने मा.वित्त व नियोजन मंत्री यांच्या चंद्रपूर येथील निवासस्थानी माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या दरम्यान त्यांच्या प्रलंबित मागण्याबाबत मोर्चाचे आयोजन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोर्चेक-यांच्या मागण्या कोणकोणत्या आहेत, त्यापैकी कोणकोणत्या मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत,

(३) तसेच मान्य केलेल्या मागण्याबाबत व उर्वरित मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत स्वयंपाकी तथा मदतनीस यांना वेतनश्रेणी मिळणे, मानधनात वाढ करणे, कामावरुन कमी न करणे, केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली लागू करणे, आहार शिजविण्याव्यतिरिक्त काम न देणे, तंदुरुस्ती प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे, शिजविण्यासाठी गॅस उपलब्ध करुन देणे, मानधन व इंधनभाजीपालासाठीचा निधी थेट बँक खात्यावर जमा करणे, करारनामा पध्दत बंद करणे, पेंशन देणे इ.मागण्या केल्या आहेत.

मानधन व इंधन-भाजीपाल्याचा निधी जिल्हास्तरावरुन थेट संबंधितांच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दि.२६/०२/२०१४ च्या परिपत्रकाचा चुकीचा अर्थ लावून ज्या स्वयंपाकी तथा मदतनीस यांना कामावरुन कमी करण्यात आले होते, त्यांना पुन्हा कामावर रुजू घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली सुरु करणे आहार शिजविण्यासाठी गॅस कनेक्शन उपलब्ध करुन देणे, याबाबत कार्यवाही सुरु आहे. स्वयंपाकी तथा मदतनीस यांची नियुक्ती करार पध्दतीने असल्याने त्यांना नियमित कर्मचा-यांप्रमाणे लाभ देता येणार नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महापालिका क्षेत्रातील सन २००० नंतर अनुदानास पात्र ठरलेल्या शाळांना अनुदानाचे वाटप करण्याबाबत

**(१३) ५०७४८ (१२-०५-२०१६). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिका क्षेत्रातील सन २००० नंतर अनुदानास पात्र असलेल्या सुमारे ४३ शाळांना दिनांक २० फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या शिक्षण समितीच्या ठरावाप्रमाणे १६ कोटी रुपयांची रक्कम मंजूर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच दिनांक २० फेब्रुवारी, २०१५ च्या नंतरच्या ३ महिन्यांच्या कालावधीत अनुदानाचे वाटप करण्याचे निश्चित करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) तथापि, माहे सप्टेंबर, २०१५ अखेरपर्यंत अनुदानाच्या रक्कमेचे वाटप न झाल्यामुळे अणुशक्तीनगर ट्राम्बे येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री व मा.शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ४३ शाळांना अदयापी अनुदानाचे वाटप न होण्याची कारणे काय आहेत तसेच अनुदानाचे वाटप लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-११-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) शासन पत्र दिनांक १३ जानेवारी, २००४ अन्वये सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षापासून बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या क्षेत्रात मान्यता दिलेल्या खाजगी प्राथमिक शाळांचे अनुदान यापुढील कालावधीत ग्राह्य धरले जाणार नाही असा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेस कळविण्यात आला आहे. त्यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील चेंबूर येथील रेयॉन इंटरनॅशनल हायस्कूल मधील एका दुखापतग्रस्त विद्यार्थ्याला वैद्यकिय खर्च व शाळेची फी माफ करण्याबाबत**

**(१४) ५२३७५ (१२-०५-२०१६). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील चेंबूर येथील रेयॉन इंटरनॅशनल हायस्कूल मधील कु. हर्ष जयप्रकाश अग्रवाल या मुलाला दिनांक ३ ऑगस्ट, २०१५ रोजी शाळेत एका मुलाने कात्री डोळ्यात घूसवून दुखापत केल्याप्रकरणी दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी कृ. हर्ष अग्रवाल यांस संपूर्ण वैद्यकिय खर्च व शाळेची फी माफ करण्याचे लेखी आश्वासन शाळा व्यवस्थापनाने दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आश्वासनानुसार अद्यापपर्यंत कोणतीच मदत दिली नसल्याने या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांना दिनांक १६ फ़ेब्रुवारी २०१६ रोजीच्या सुमारास निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने मदत करण्याविषयी अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-११-२०१६) :** (१) हे खरे आहे
(२) शाळेचे विश्वस्त, मुख्याध्यापक व तक्रारदार श्री. जयप्रकाश अग्रवाल यांच्यामध्ये झालेल्या निर्णयानुसार शाळेमार्फत धनादेश क्र. ९५६६०२ दिनांक ११.०४.२०१६ अन्वये रुपये ३,००,०००/- श्री. अग्रवाल यांना अदा करण्यात आले असून त्यांनी स्विकारले असून या व्यक्तिरिक्त शाळेमार्फत, विश्वस्त मार्फत कोणतीही मदत मिळणार नाही, असे तडजोडीचे पत्र श्री. अग्रवाल यांनी स्विकारलेले आहे.
तथापि या प्रकरणी संबंधित शाळेने राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानग्रह अनुदान योजने अंतर्गत शासनाकडून अनुदान मिळण्यासाठी प्रस्ताव सादर केलेला नाही.
(४) लागू नाही.

---

## कायम विना अनुदानित तत्वावर चालणाऱ्या खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांना अनुदान देण्याबाबत

**(१५) ५४०१८ (२२-०८-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००० सालापासुन कायम विना अनुदानित तत्वावर चालणाऱ्या खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांचा 'कायम' हा शब्द सन २००९ साली काढण्यात येऊन सन २०१२ मध्ये या शाळांचे मुल्यांकन करुन १२४३ शाळा अनुदानासाठी घोषित करण्यात आल्या तर किरकोळ त्रुटी काढल्याने अनेक शाळा अनुदानापासून वंचित राहिल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदानापासून वंचित राहिलेल्या शाळांनी नंतर त्रुटींची पूर्तता करुनही अघोषितच राहिल्याने दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी मा.शिक्षण मंत्री यांनी अनुदानाबाबत दिलेल्या आश्वासनाने २० हजार शिक्षकांच्या मोर्चाला शांत केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षक प्रतिनिधीचे शिष्टमंडळ यांनी दिनांक २५ मे, २०१६ रोजी मा.शिक्षण मंत्री यांच्या घेतलेल्या भेटीच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-११-२०१६) :** (१), (२) व (३) शासन निर्णय दिनांक १ जुलै, २०१६ व २ जुलै, २०१६ अन्वये मुल्यांकनात पात्र ठरलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना अनुदानास पात्र घोषित करण्यात आले आहे. अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रंथपालांना सेवा-नियम, वेतनश्रेणी लागू करण्याबाबत प्रभा राव व व्यंकप्पा पत्की समितीने सादर केलेला अहवाल

**(१६) ५४५४८ (२२-०८-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गाव तेथे ग्रंथालय असे धोरण शासनाने राबविले असले तरी ग्रंथपालांना सेवा-नियम, वेतनश्रेणी लागू करण्याबाबत १९७२ मध्ये प्रभा राव समिती आणि २००० मध्ये व्यंकप्पा पत्की समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशी संदर्भात शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने ग्रंथपालांना पेन्शन योजना, ग्रॅच्युइटी, वैद्यकिय सुविधा देण्यासंदर्भात कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येणार आहे तसेच त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींमध्ये एकसूत्रता येण्याकरिता सेवाविषयक सवलती व सुविधांविषयक मार्गदर्शक तत्वे/सूचनांबाबत शासनाने दिलेल्या निर्देशानुसार ग्रंथालय संचालनालयाने दिनांक ०८.०५.२०१३ चे परिपत्रकान्वये सूचना दिलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव शहरातील मू.जे. महाविद्‌यालयातील विवेकानंद भवन दिनांक २१ एप्रिल, २०१६ रोजी एमएस्सी प्रथम वर्षाचा ॲडव्हान्स कॅलकुलेस या विषयाची प्रश्नपत्रिका उशिरा मिळाल्याबाबत**

**(१७) ५४५६३ (२२-०८-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव शहरातील मू.जे. महाविद्‌यालयातील विवेकानंद भवन दिनांक २१ एप्रिल, २०१६ रोजी एमएस्सी प्रथम वर्षाचा ॲडव्हान्स कॅलकुलेस या विषयाची प्रश्नपत्रिका ५५ मिनिटे उशिरा मिळाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्नपत्रिका उशिरा मिळण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, यामुळे विद्‌यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे. सदर विषयाचा पेपर दिनांक २०/०४/२०१६ रोजी होता. सदर परीक्षा केंद्रात तांत्रिक अडचणीमुळे ४० मिनीटे उशीरा परीक्षा सुरु झाली होती.
(२) महाविद्‌यालयातील इंटरनेट व विद्‌युत पुरवठयामध्ये तांत्रिकदृष्टया बिघाड झाला होता.
(३) सदर विषयासाठी या विद्‌यार्थ्यांना ४० मिनीटांची वेळ वाढवून दिलेला होता.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तत्कालीन विभागीय शिक्षण उपसंचालक व सहाय्यक संचालक, औरंगाबाद विभाग यांचे विरूद्धच्या भ्रष्टाचारबाबत**

**(१८) ५५३०३ (२२-०८-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वश्री सुखदेव डेरे आणि सुधाकर बानाटे, तत्कालीन विभागीय शिक्षण उपसंचालक व सहाय्यक संचालक औरंगाबाद विभाग यांचे विरूद्धच्या भ्रष्टाचारा प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शालेय शिक्षण मंत्र्यांकडे दिलेल्या तक्रारींची चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, चौकशीमध्ये काय आढळून आले व तद्नुसार दोषी आढळून आलेल्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२५-१०-२०१६) :** (१) व (२) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने आयुक्त, शिक्षण यांच्याकडून प्राप्त प्रस्तावानुसार श्री.सुखदेव डेरे, तत्कालीन विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांच्याविरुध्द दिनांक १८ मे, २०१६ च्या ज्ञापनान्वये म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. तसेच श्री.सुधाकर बनाटे, तत्कालीन सहायक संचालक, औरंगाबाद यांच्याविरुध्द विभागीय चौकशीबाबत आयुक्त, शिक्षण यांच्याकडून प्राप्त प्रस्तातावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शाळांचा दर्जा ठरविण्यासाठी सुरु असलेल्या प्रगत शैक्षणिक कार्यक्रमानुसार शासनाला माहिती सादर करण्याबाबत**

**(१९) ५५७२४ (२२-०८-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मुंबईसह राज्यातील शाळांचा दर्जा ठरविण्यासाठी राज्यभर सुरू केलेल्या "प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र" या कार्यक्रमात शालेय शिक्षण विभागाने जारी केलेल्या २५ निकषाच्या आधारे मुंबईतील प्राथमिक, उच्च प्राथमिक १२३८ शाळांपैकी फक्त ४८७ शाळांनी शासनाला माहिती सादर केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच रायगड जिल्हयातील २ हजार ८३० शाळांपैकी केवळ सातशे बाराच शाळा प्रगत असून ७५ टक्के शाळा अप्रगत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांचा दर्जा सुधारावा आणि दर्जात्मक शाळा ठरविता याव्यात याकरिता शासन प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम राबवित आहे हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने प्रश्नोक्त भाग (१) व (२)बाबत प्रगत नसलेल्या शाळांना गुणवत्ता वाढविण्यासाठी त्यांच्यावर निर्बंध घातले आहेत हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त माहिती सादर न करणाऱ्या शाळांवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-११-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाने राज्यातील शाळांमध्ये फळा आणि खडूविना डिजिटल स्कूलची संकल्पना राबविण्याचा घेतलेला निर्णय**

**(२०) ५५९१५ (२२-०८-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील संपूर्ण शाळांमध्ये फळा आणि खडूविना डिजिटल स्कूलची संकल्पना राबविण्याचा शासनाने निर्णय घेतल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने राज्यातील शाळा डिजिटल करण्याबाबत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करुन त्यांची कार्यवाही करण्यात आली काय,

(३) असल्यास, शासनाने राज्यातील आदिवासी, दुर्गम ग्रामीण भागातील शाळांना डिजिटल शाळेसाठी आवश्यक ती साधनसामुग्री पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत. ?

**श्री. विनोद तावडे (०१-१२-२०१६) :** (१) दिनांक २२ जून, २०१५ च्या शासन निर्णयान्वये डिजीटल शाळेची संकल्पना राबविण्यात येत आहे.

(२) व (३) सन २०१५-१६ करीता राज्यातील १६८३ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उच्च प्राथमिक शाळांमध्ये interactive classroom स्थापन करण्याकरता केंद्र शासनाकडून रु.१४४५.४० लक्ष मंजूर तरतूदीच्या अनुषंगाने ई निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली होती. परंतु तांत्रिक कारणास्तव ई निविदा प्रक्रिया सन २०१५-१६ मध्ये पूर्ण होऊ न शकल्याने सदर प्रक्रिया सन २०१६-१७ मध्ये करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नविन ग्रंथालयांना २०११-२०१४ पासून मान्यता आणि दर्जावाढच दिली नसल्यामुळे ग्रंथालये ओस पडलीअसल्याबाबत**

**(२१) ५५९३७ (२२-०८-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गाव तिथे ग्रंथालय या सरकारच्या उद्दिष्टास प्रतिसाद देत शहरासह ग्रामीण भागात स्वयंसेवी संस्थांनी ग्रंथालये सुरु केली असून सरकारने नविन ग्रंथालयांना २०११-२०१४ पासून मान्यता आणि दर्जावाढच दिली नसल्यामुळे ग्रंथालये ओस पडली असल्याचे दिनांक ५ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गाव तिथे ग्रंथालये यास शासनाकडून मिळणारे अनुदान हे अपुरे व वेळेत मिळत नसल्यामुळे ग्रंथालयातील साधनसामग्री पुरविण्यास व्यवस्थापनेस अडचणी येत असल्यामुळे वाचन चळवळ वाढण्यास खीळ बसली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२५-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली येथील लिंबाळा मवना भागामध्ये क्रिडा विभागातर्फे कोटयावधी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेला जलतरण तलाव बंद असल्याबाबत**

**(२२) ५६२१६ (२२-०८-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली येथील लिंबाळा मवना भागामध्ये क्रिडा विभागातर्फे कोटयावधी रुपये खर्च करुन जलतरण तलाव बांधण्यात आला परंतु या तलावाच्या कामातील अनियमितता व नादुरुस्तीमुळे हा जलतरण तलाव सन २००८-०९ पासून बंद असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावाचे निकृष्ट काम करणा-यांवर कारवाई करण्या सोबतच या तलावाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्याची, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-११-२०१६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे. मौ.लिंबाळा मक्ता हिंगोली येथील जिल्हा क्रीडा संकुलात जलतरण तलाव बांधण्यात आला आहे. परंतु सन २००७-०८ पासून सदर जलतरण तलाव देखभाल दुरुस्ती अभावी बंद आहे. जलतरण तलावाच्या कामातील अनियमितते संदर्भात कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, हिंगोली यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून संबंधित वास्तुविशारद व कंत्राटदारांना नुकसान भरपाईची वसुली करण्यासाठी अंतिम नोटीस देऊन त्यांच्या सुरक्षाठेव रक्कमेतून सदरची रक्कम वसुल करुन जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या खात्यावर जमा करण्याचे प्रस्तावित आहे.

जलतरण तलावाच्या दुरुस्ती संदर्भात जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या दिनांक १५.०७.२०१६ च्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार दै. लोकमत मध्ये दिनांक ३१.०८.२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिर दरपत्रक सूचनेनुसार या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तिंकडून दरपत्रके मागविण्यात आली आहेत. सदर दरपत्रके तपासुन त्यास तांत्रिक मान्यता देण्यास कार्यकारी अभियंता, सां.बां., हिंगोली यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत आहे.

---

**देऊळगाव घुवे (ता.देऊळगाव, जि.बुलढाणा) येथील पंचयात युवा क्रिडा व खेळ योजनेमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(२३) ५६८०४ (२२-०८-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगाव घुवे (ता.देऊळगाव, जि.बुलढाणा) येथील पंचयात युवा क्रिडा व खेळ योजनेमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यात यावी, या मागणीसाठी माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान ग्रामस्थांनी बेमुदत उपोषण सुरु केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचयात युवा क्रिडा व खेळ योजनेतील गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-१०-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. सदर उपोषणाबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी, बुलढाणा यांनी ग्रामपंचायत सचिव, सरपंच तसेच संबंधित उपोषणार्थी यांनी जागेस प्रत्यक्ष भेट दिली असता, काम पूर्ण झाल्याचे प्रकारचा गैरव्यवहार झालेला आढळून आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) नेमूक दिलेल्या निकषाकडे दुर्लक्ष करणाऱ्या इंजिनियरींग कॉलेजवर कारवाई करणेबाबत**

**(२४) ५६८३९ (२२-०८-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.अमित घोडा (पालघर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.राहूल कुल (दौंड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील मान्यता नसलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयाची यादी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) अद्यायावत केली असून, मान्यता नसलेल्या १८ संस्थांपैकी मुंबई शहरात १५ संस्था कार्यरत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील इंजीनियरिंग कॉलेजांनी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) नेमुन दिलेल्या निकषांकाकडे दुर्लक्ष केलेल्या १०९ कॉलेजांना तंत्रशिक्षण संचालनालयाने (डीटीइ) नोटीसा बजावल्या असून, ५४ इंजीनियरिंग कॉलेजांवर कारवाईचा तर १३० कॉलेजांची प्रवेश क्षमता कमी करण्याचा निर्णय एआयसीटीईने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पायाभूत सुविधांचा अभाव, अपुरा शिक्षक वर्ग व बांधकाम निकषाचे उल्लंघन केलेल्या राज्यातील अभियांत्रिकी (इंजिनीअरिंग) महाविद्यालयाचे अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेमार्फत (एआयसीटीई) दिनांक १८ एप्रिल २०१६ पासून माटूंगा येथील व्हीजेटीआय या संस्थेमध्ये महाविद्यालयांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली असून या सर्व महाविद्यालयांची चौकशी सुरू केली असल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या चौकशी समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय व त्यानुसार संबंधित अटी व शर्तीचा भंग करणाऱ्या महाविद्यालयांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-१०-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने एकूण १२ संस्थांची प्रवेशबंदी केली आहे व एकूण ६८ संस्थांची प्रवेशक्षमता कमी केली आहे.

(३) व (४) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद ही केंद्र शासनाच्या नियंत्रणाखालील शिखर संस्था असल्याने सदर परिषदेकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत राज्य शासनास अहवाल सादर केला जात नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत**

**(२५) ५७०२७ (२२-०८-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी करण्याचा निर्णय शासनाने घेवूनही अद्याप सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच राज्यभरातील विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१६) :** (१), (२) व (३) विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्याबाबतच्या दिनांक २१.०७.२०१५ च्या शासन निर्णयातील तरतूदींची अंमलबजावणी करण्याबाबत दिनांक ०५.११.२०१५ च्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेली आहे. या सूचनांची अंमलबजावणी न झाल्यास शाळेच्या दैनंदिन कामकाजात लक्ष घालणा-या व नियामक मंडळाने नामनिर्देशित केलेल्या एका संचालकांना व शाळेच्या मुख्याध्यापकांना जबाबदार धरण्यात येणार आहे. या सर्व सूचना शाळांना प्राप्त झाल्या असून, शाळांनी दप्तराचे ओझे कमी करण्याबाबतच्या उपाययोजनांना सुरुवातही केली आहे.
जून, २०१६ मध्ये राज्यातील ३६ जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या दप्तराची यादृच्छिक (Randomly) तपासणी केली असता एकूण सरासरी ८७.४५% विद्यार्थ्यांचे दप्तराचे वजन निकषाइतके असल्याचे आढळून आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात एमबीए शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता व या क्षेत्रातील अभ्यासक्रमाचा घसरलेला दर्जा**

**(२६) ५७५५२ (२२-०८-२०१६). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राहुल**

**जगताप (श्रीगोंदा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एमबीएचा अभ्यासक्रम असलेली विनाअनुदानित ३६१ खाजगी शिक्षण संस्था आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी एमबीए महाविद्यालयाच्या शिक्षणाचा दर्जा व गुणवत्तेनुसार पदवी घेतल्यानंतर नोकरी मिळेलच याची शाश्वती नसल्याने विद्यार्थी बेरोजगार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एमबीए शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता व या क्षेत्रातील अभ्यासक्रमाचा घसरलेला दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-१०-२०१६) :**(१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) एमबीए या पदव्युक्तर पदवी अभ्यासक्रमाचा पाठ्यक्रम विद्यापीठामार्फत तयार करण्यात येतो. तसेच त्यांच्या स्तरावरुनच कालानुरुप त्यात योग्य ते बदल करण्यात येतात.

---

## लातूर जिल्ह्यात पाणी पुरवठा योजना व इतर कामे पूर्ण करण्यासाठी थकीत निधी देण्याबाबत

**(२७) ५७७९२ (२०-०८-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हा परिषदेने टंचाई निवारणासाठी ७९६ गावांत टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु केला असून त्यावर १६ कोटी ८१ लाखाचा खर्च झाला आहे, त्यातील फक्त ८ कोटी रुपयाचा निधी मिळाला असून उर्वरित ८ कोटी ८१ लाख रुपयांचा निधी न मिळाल्याने पाणी टंचाईने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर जिल्हा परिषदेने थकीत ८ कोटी व इतर २ कोटी मिळून १० कोटी रुपये निधीची शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाणी पुरवठा योजना व इतर महत्त्वाची अन्य कामे लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी थकीत निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२८-१०-२०१६) :** (१) लातूर जिल्हा परिषदेमार्फत पाणी टंचाई निवारणासाठी १ ऑक्टोबर, २०१५ ते ३१ जुलै, २०१६ या कालावधीमध्ये ३१६ गावे/ वाड्यांना ३६० टँकरद्वारे पाणी पुरवठा केलेला असून त्यावर एकूण १५ कोटी ९ लाख ७५ हजार रुपयांचा

निधी खर्च झालेला आहे. त्यापेकी शासनाकडून ६ कोटी ५४ लाख ९४ हजार रुपयांचा निधी वितरित केला असून उर्वरित ८ कोटी ५४ लाख ८१ हजार रुपयांचा निधी वितरित करावयाचा आहे.

(२) व (३) लातूर जिल्हा परिषदेची दिनांक ३१.०७.२०१६ अखेर टंचाई निवारणार्थ उपाययोजनांतर्गत टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे यासाठी ८५४.८१ लक्ष व इतर उपाययोजनांसाठी ९४८.२८ लक्ष अशी एकूण १८०३.०९ लक्ष रुपये निधीची मागणी आहे. त्याबाबत निधी मागणीबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडून शासनास प्राप्त झाल्यानंतर निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विनाअनुदानीत कनिष्ठ महाविद्यालयांवर अन्याय होत असल्याबाबत

**(२८) ५७८७१ (२२-०८-२०१६). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कायम विनाअनुदानित तत्वावरील कनिष्ठ महाविद्यालयाचा “कायम” शब्द वगळल्यावर राज्यात अन्यत्र ऑनलाईन मुल्यांकन होऊन ऑफलाईन मुल्यांकनही झाले परंतु रत्नागिरी व सिंधुदूर्ग या दोन जिल्हयात हे ऑफ लाईन मुल्यांकन झाले नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, “कायम” हा शब्द दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ रोजी वा त्या सुमारास काढण्यात आला मात्र अद्यापही शासनाकडून मुल्यांकन करुन अनुदान मंजुर करण्याची पुर्तता करण्यात आली नसल्याने उक्त करणास्तव कोकणातील विनाअनुदानीत कनिष्ठ महाविद्यालयांवर अन्याय होत आहे हे लक्षात घेता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-११-२०१६) :** (१) व (२) रत्नागिरी व सिधुदुर्ग जिल्हयातील कनिष्ठ महाविद्यालयाचे मुल्यांकन झालेले असून त्यावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने घरकामगार महिला, रिक्षाचालक, टॅक्सी चालक कामगारांसाठी विविध अभ्यासक्रम सुरु केल्याबाबत.

**(२९) ५७९६१ (२२-०८-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने घरकामगार महिला, रिक्षाचालक, टॅक्सी चालक कामगारांसाठी विविध अभ्यासक्रम सुरु केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ढिसाळ नियोजन, अभ्यासक्रमाच्या प्रचार व प्रसाराचा अभाव अशा कारणामुळे हे अभ्यासक्रम बंद पडण्याच्या मार्गावर आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षणापासून वंचित असणा-यापर्यंत ज्ञानगंगा पोहोचणार असे अभ्यासक्रम सुरु ठेवण्यासाठी शासनामार्फत काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. परंतु टॅक्सी चालक, रिक्शा चालक कामगारांसाठी बी.ए. मार्ग परिवहन हा शिक्षणक्रम सुरु करण्यात आला. त्यासाठी खाजगी ड्रायव्हिंग शिकवणा-या संस्थांचे सहकार्य घेण्यात आले. परंतु या संस्थांकडे पदवी स्तरातील शिक्षण देण्यासाठी आवश्यक यंत्रणा नसल्याने विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. त्यामुळे सदर शिक्षणक्रमाची उद्दिष्टे साध्य होत नसल्याने विद्यापीठाच्या मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा परिषदेने दि.२८/०३/२०१६ रोजी झालेल्या बैठकीत सदर शिक्षणक्रम सध्या स्थगित केलेले आहेत.
(३) शिक्षणापासून वंचित असणा-या घटकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना विद्यापीठामार्फत करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बनावट कागपत्रांच्या आधारे सन २००८-०९ चा शिवछत्रपती पुरस्कार मिळविल्याबद्दल**

**(३०) ५८०४९ (२२-०८-२०१६). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) क्रीडा सचिव, क्रीडा मंत्री यांचेकडे क्रीडा खात्याचे उपसंचालक माणिक ठोसरे व अन्य व्यक्तीनी बनावट कागपत्रांच्या आधारे सन २००८-०९ चा शिवछत्रपती पुरस्कार मिळविल्याबद्दल कारवाई करण्याकरीता दिनांक ८ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास श्री. अन्सारी यांनी लेखी तक्रार केल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी क्रीडा सहसंचालक यांनी चौकशी केली असून, चौकशीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, त्यामध्ये दोषी आढळलेल्या व्यक्तीविरुध्द शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-१०-२०१६) :**(१) होय.
(२) व (३)
सदर प्रकरणी अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्यानुसार कोणीही व्यक्ती दोषी आढळले नाहीत.

---

## राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या व वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील महाविद्यालयामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत

**(३१) ५८२८४ (३०-११-०००२). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अभियांत्रिकी वैद्यकीय शिक्षणासह राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या व वैद्यकिय शिक्षण विभागाच्या अखत्यारितील महाविद्यालयामध्ये शिकणाऱ्या सुमारे सव्वादोन लाख मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतल्यानंतर ही त्याच्या अंमलबजावणीचा घोळ वर्षानुवर्षे सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जून-जुलै मध्ये महाविद्यालय सुरू झाल्यानंतर ही सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीच्या कोट्यावधी रुपयाच्या प्रस्तावास मंजुरी नसल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षाकरिता विदयार्थ्यांच्या, शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीचा प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-१०-२०१६) :** (१), (२) व (३) दिनांक ३१/०३/२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पनवेल (जि.रायगड) कृषी उत्पन्न बाजार समितीमधील भाजीपाल्याचा कचरा गाढी नदीच्या पात्रात टाकत असल्यामुळे होणारे प्रदूषण

**(३२) ५८४२९ (१०-०८-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) कृषी उत्पन्न बाजार समिती भाजीपाल्याचा कचरा जवळच असलेल्या गाढी नदीच्या पात्रात टाकत असल्यामुळे तसेच कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कचऱ्याला

आग लावल्यामुळे धुरांच्या लोंढयामुळे प्रदुषणात वाढ होत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे जून २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गाढी नदीच्या पात्रात कचरा टाकल्यामुळे गाढी नदीच्या अस्तित्वालाही धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, त्यानुषंगाने उक्त भाजीपाल्याच्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२७-१०-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) गाढी नदीच्या बाजूच्या जागेत कचरा टाकणे बंद केले असून सदर कच-याबाबत कृषि उत्पन्न बाजार समिती मार्फत मा. मुख्याधिकारी, पनवेल नगर परिषद यांच्याशी चर्चा करुन नगर परिषदेच्या सहमतीने त्यांनी नेमून दिलेल्या जागेवर कच-याची विल्हेवाट लावण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उदगीर (जि. लातूर) येथे अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी उच्च महाविद्यालय व मुलांचे वसतीगृह मंजूर करण्याबाबत

**(३३) ५८६५१ (२०-०८-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) येथे जैन, मुस्लिम व ख्रिश्चन समाजाची संख्या बहुसंख्याक असल्यामुळे या ठिकाणी मुलांसाठी वसतीगृह व उच्च महाविद्यालय मंजूर करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रनिनिधी यांनी माहे मार्च, २०१६ मध्ये वा दरम्यान शासनानकडे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती अल्पसंख्यांक समाजासाठी मुलाचे वसतीगृह व उच्च महाविद्यालय मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) १२ व्या पंचवार्षिक योजनेत केंद्र पुरस्कृत बहु क्षेत्र विकास कार्यक्रमातंर्गत लातूर जिल्ह्यातील, उदगीर शहरासाठी ०१ मुलींचे वसतीगृह इमारत बांधकाम, ०१ शाळा इमारत बांधकाम, ०१ औद्योगिक प्रशिक्षण संस्था इमारत बांधकामाच्या एकूण रु. १०१७.५७ लाख इतक्या रकमेच्या प्रस्तावास केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील रामटेक व पारशिवनी या तालुक्याच्या ठिकाणी क्रिडा संकूलास निधी देण्याबाबत

**(३४) ५८९०० (२२-०८-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील रामटेक व पारशिवनी या तालुक्याच्या ठिकाणी क्रीडा संकूलास निधी देण्याचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.क्रीडा मंत्री यांना माहे मार्च, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-१०-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. तालुका क्रीडा संकुल, रामटेक व पारशिवणी या दोन्ही क्रीडा संकुलास संकुल समितीने शासन अनुदान मर्यादेच्या अधिन राहून सादर केलेल्या सुधारित अंदाजपत्रक व आराखड्यास दिनांक ०४.०४.२०१६ रोजी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विना अनुदानित शिक्षकांनी अनुदानाच्या मागणीसाठी केलेल्या आंदोलनाबाबत

**(३५) ५९२१७ (२२-०८२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विना अनुदानित शिक्षकांनी त्यांच्या अनुदानाच्या मागणीसाठी माहे जून २०१६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास राज्यभर आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईसह राज्यभर आंदोलन करणाऱ्या १०६ शिक्षक आंदोलन कर्त्यांची प्रकृती आंदोलनामुळे गंभीर झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शिक्षकांना तातडीने अनुदान देणेबाबत मा. मुख्यमंत्री यांनी मा. शिक्षणमंत्री व मा. वित्त मंत्री यांना निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या शिक्षकांना अनुदान देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे (१५-११-२०१६) :** (१), (२), (३) व (४) शासन निर्णय दिनांक १ जुलै, २०१६ व २ जुलै, २०१६ अन्वये मुल्यांकनात पात्र ठरलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उबाळखेड, हनवतखेड, नाईकनगर (ता. मोताळा, जि. बुलडाणा) येथे विहीर अधिग्रहणाचे अनुदान रखडल्याबाबत**

**(३६) ५९४६७ (१०-०८-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उबाळखेड, हनवतखेड, नाईकनगर (ता.मोताळा, जि.बुलडाणा) व अन्य गावांसाठी सन २०१४-१५ मध्ये पाणी टंचाई निवारणार्थ विहीर अधिग्रहण करण्यात आल्याचे माहे मे २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अधिग्रहीत करण्यात आलेल्या विहीरींचा मोबदला संबंधित शेतक-यांना शासनाकडून दिला जातो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त गावांतील शेतकऱ्यांना अद्यापही सदर मोबदला मिळाला नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुषंगाने सदर मोबदला मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२६-१०-२०१६) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) सदर मोबदला मिळण्यासाठी निधीची मागणी प्राप्त झाली असून निधी मिळणेबाबतचे देयक कोषागार विभागामध्ये सादर केले असून धनादेश प्राप्त होताच निधी वितरित करण्यात येईल. त्यानंतर गट विकास अधिकारी, मोताळा यांचेमार्फत नियमानुसार देयके अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डहाणू व तलासरी (जि.पालघर) तालुक्यात आदिवासी पाड्यातील भीषण पाणी टंचाईबाबत**

**(३७) ५९५२३ (१०-०८-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू व तलासरी (जि.पालघर) तालुक्यात आदिवासी पाड्यात भीषण पाणीटंचाई असल्याचे दिनांक २१ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती चौकशी केलेली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (२६-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बालेवाडी पुणे येथील क्रीडा संकुल देखभाल दुरुस्तीसाठी पुरेसा निधी नसल्याने पायाभूत सुविधांचा दर्जा राखण्यास अडचणी

**(३८) ६०१८० (२२-०८-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालेवाडी पुणे येथील क्रीडा संकुल हे राज्यातील राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध असणारे एकमेव क्रीडा संकुल आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ देखभाल दुरुस्तीसाठी पुरेसा निधी नसल्याने पायाभूत सुविधांचा दर्जा राखण्यास अडचणी येत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या क्रीडा संकुलाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी दरवर्षी रुपये १२ कोटी उपलब्ध करुन द्यावे अशी मागणी महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन यांचेकडून माहे नोव्हेंबर, २०१५ वा त्या दरम्यान शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.?

**श्री. विनोद तावडे (१८-११-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी करिता दुरुस्ती व देखभालकरिता हिवाळी अधिवेशन सन २०१६ मध्ये पुरवणी मागणीव्दारे निधी उपलब्ध करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कायम विना अनुदानित शाळांचा कायम हा शब्द काढल्यानंतर ज्या शाळांचे मुल्यांकन व पुर्नमुल्यांकन करण्यात आलेल्या अशा शाळांची यादी करण्यात आली नसल्याबाबत

**(३९) ६०४७२ (२२-०८-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कायम विना अनुदानित शाळांचा कायम हा शब्द काढल्यानंतर ज्या शाळांचे

मुल्यांकन व पुर्नमुल्यांकन करण्यात आले अशा शाळांची यादी माहे जानेवारी २०१५ अखेर करण्यात आली नाही,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर यादी  करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-११-२०१६) :** (१), (२) व (३) शासन निर्णय १ जुलै, २०१६ व २ जुलै, २०१६ अन्वये मुल्यांकनात पात्र ठरलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना अनुदानास पात्र घोषित करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयासोबत पात्र शाळांची यादी आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव क्रिडा संकुलनाच्या मैदानावर शासनाने क्रिकेटसाठी बंदी केली असता नाही सामन्यांना परवानगी दिल्याबाबत**

**(४०) ६०५६० (२२-०८-२०१६). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव क्रिडा संकुलाच्या मैदानावर क्रिकेट खेळण्यास बंदी असताना लोकप्रतिनिधींनी आयोजित केलेल्या सामान्यांना प्रशासनाने माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान परवानगी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-१०-२०१६)** :(१) व (२) जळगांव क्रीडा संकुलाच्या मैदानावर क्रीकेट खेळण्यास क्रीडा संकुल समितीमार्फत कोणतीही बंदी घातलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खेड तालुका क्रीडा संकुलाची (जि.पुणे) अतिशय दुर्दशा झालेली असल्याबाबत**

**(४१) ६१२२७ (२२-०८-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्याल क्रीडा संकुलाचीअतिशय दुर्दशा झालेली असल्याने व खेळाचे कोणतेच साहित्य उपलब्ध नसल्याने खेळाडूंना गैरसोयीला सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये  वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात तालुका क्रीडा संकुल समितीची बैठक दि.३/५/२०१६ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आली होती हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, क्रीडा संकुलाची दुरुस्ती करणे व क्रीडा साहित्य उपलब्ध करून देणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (१५-११-२०१६) :** (१) व (२) तालुका क्रीडा संकुल समितीची बैठक दिनांक ०३.०५.२०१६ रोजी घेण्यात आली. तथापि, खेळाडूंची गैरसोय होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) मार्च, २०१६ मध्ये क्रीडागंण विकास अनुदान योजनेमधून रु. ३.०० लक्ष रकमेचे साहित्य संकुलास मंजूर करुन एप्रिल, २०१६ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच क्रीडा संकुलाच्या दुरुस्तीच्या कामासाठी अंदाजपत्रकानुसार आवश्यक निधी सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे हस्तांतरीत करुन कामे हाती घेण्याची कार्यवाही समितीमार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्याला पेयजल योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या निधीमध्ये कपात केली असल्याबाबत**

**(४२) ६१३२० (१०-०८-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दरवर्षी पेयजल योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मिळणाऱ्या ८०० कोटी रुपयांच्या निधीमध्ये केंद्र शासनाने कपात केली असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत वर्षी राज्याला केंद्र शासनाकडून केवळ ३४६ कोटी रुपंयाचा निधी देण्यात आला व चालू आर्थिक वर्षातही केवळ ८० कोटी रुपयांचा निधी देवून केंद्र शासनाने मराठवाड्यांसह राज्यात पाणी टंचाई निर्माण झाली असताना पेयजल योजनेच्या निधीमध्ये कपात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने दुष्काळी परिस्थितीत जास्तीत जास्त निधी केंद्र शासनाकडून मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२९-१०-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.
केंद्र शासनामार्फत सन २०१५-१६ पासून १४ व्या वित्त आयोगामार्फत थेट ग्रामपंचायतीस अतिरिक्त अनुदान वितरित करण्याचे धोरण स्विकारले आहे.यास अनुसरुन केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या केंद्र हिश्श्यात कपात केली आहे.

(२) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१५-१६ मध्ये केंद्र हिश्श्यांतर्गत रु.३४४.१६ नियतव्ययापैकी रु.३३०.८८ कोटी एवढा निधी राज्यास उपलब्ध करुन देण्यात आला. तसेच चालू आर्थिक वर्ष सन २०१६-१७ मध्ये केंद्र हिश्श्यांतर्गत रु.३४६.१६ नियतव्ययापैकी आत्तापर्यंत रु.१६५.५९ कोटी एवढा निधी राज्यास प्राप्त झाला आहे.
(३) महसूल व वन (म.व पु.) विभागास केंद्र शासनाकडून सन २०१५-१६ मध्ये पेयजल टंचाई निवारणार्थ रु.१२७.०० कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राळेगांव जि. यवतमाळ येथी क्रिडा संकुल बेवारस स्थितीत असल्याबाबत**

**(४३) ६१५१७ (२२-०८-२०१६). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राळेगांव जि. यवतमाळ येथे शासनाव्दारे लाखो रूपये खर्च करून क्रिडा संकुल बांधकाम करण्यात आलेले असुन या क्रीडा संकुलामध्ये गवत व दगड, गोटे व अस्वच्छता असल्यामुळे तसेच धावपट्टीव्यवस्थित नसल्यामुळे तेथील क्रिडापटुंना व खेळाडूंना कोणत्याही प्रकारचा लाभ होत नसल्याचे दिनांक ५ मे २०१६ वा त्या सुमारास निर्दशनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे कडून क्रीडासंकुलाच्या स्वच्छतेसाठी व अपुर्ण कामासाठी निधी दिला जातो हे ही खरे आहे काय, .
(३) असल्यास उपरोक्त बाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-१०-२०१६) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे. सदर प्रकरणी तालुका क्रीडा संकुल समितीची बैठक आयोजित करुन संकुल समितीच्या मान्यतेने क्रीडागंणाची दुरुस्ती, स्वच्छता तसेच अपुर्ण राहिलेली संकुलाची कामे शक्य तितक्या लवकर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पूर्ण करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाकडून गणवेशासाठी येणारे ७ कोटीचे अनुदान वेळेवर न मिळाल्याबाबम**

**(४४) ६१५७५ (२२-०८-२०१६). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयातील ८ तालुक्यात शाळेच्या पहिल्याच दिवशी जिल्हा परिषदेच्या २ हजार ५२० शाळांमधील विद्यार्थीना शासनाकडून गणवेशासाठी येणारे रुपये ७ कोटीचे अनुदान वेळेवर मिळाले नसल्याने ग्रामीण भागातील आदिवासी विद्यार्थ्यांवर मागच्या वर्षाचा जुना गणवेश घालून शाळेत जाण्याची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गणवेशाचे अनुदान तातडीने मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती उपायोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आर्वी, जि. वर्धा येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्‌यालय सुरु करण्याबाबत.**

**(४५) ६१६७१ (२२-०८-२०१६). श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी (जि. वर्धा) येथील विद्‌यार्थासाठी तंत्र शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी, यासाठी दिनांक ११ जून, १९९० रोजी वा त्यासुमारास शासकीय तंत्र निकेतन सुरु करण्यात आले असून जिल्ह्यात अद्‌यापही शासकीय अभियांत्रिकी महाविद्‌यालय सुरु करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रपिता महात्मा गांधी व आचार्य विनोबा भावे यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या वर्धा जिल्हयाकरिता महाविद्‌यालयासाठी इमारत व जागा उपलब्ध असूनही, महाविद्‌यालयास मंजूरी न देण्याचे नेमके कारण काय आहे,
(३) असल्यास, वर्धा जिल्ह्यात सदर महाविद्‌यालय सुरु करण्यासंबंधी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?.

**श्री. विनोद तावडे (२१-१०-२०१६) :** (१) होय.
(२) वर्धा जिल्ह्यामध्ये ५ अभियांत्रिकी महाविद्‌यालये १०६९ प्रवेशक्षमतेसह असुन शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये फक्त १६० प्रवेश झाले असुन अभियांत्रिकी अभ्यासक्रमाकरिता ९०९ जागा रिक्त आहेत.
सर्वसाधारणत: एकच विद्‌यापीठ क्षेत्रात एक शासकीय अभियांत्रिकी महाविद्‌यालय असण्याचे शासनाचे धोरण असून त्यानुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्‌यापीठ अंतर्गत २०१६-१७ मध्ये नागपूर ३०० प्रवेश क्षमतेचे येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्‌यालय स्थापन करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राजयात तालुका क्रिडा संकुल उभारणीसाठी अनुदान मर्यादेत वाढ करणेबाबत

**(४६) ६२३०४ (२२-०८-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तालुका क्रिडा संकुल उभारणीसाठी दिनांक २१ मार्च, २००९ च्या शासन निर्णय क्रमांक सक्रियो-२००५/(प्र.क्र. २५/०९) क्रीमुसे-१ नुसार अनुदान मर्यादा २५ लाखावरुन १ कोटीपर्यत वाढविली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नविन टाईप प्लॅननुसार बांधकाम करावयाचे असल्याने बांधकाम साहित्याच्या किंमतीत व बांधकाम मंजूरीत वाढ झाल्यामुळे रु.१ कोटीमध्ये क्रिडा संकुलाचे बांधकाम पूर्ण होऊ शकणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तालुका क्रिडा संकुल उभारणीसाठी अनुदान मर्यादेत वाढ करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) राज्यातील विभागीय, जिल्हा व तालुका क्रीडा संकुलांच्या बांधकामाबाबत सुधारीत कार्यपध्दती विहित करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ०२.०९.२०१५ अन्वये राज्यस्तर समिती स्थापन करण्यात आलेली होती. सदर समितीने क्रीडा संकुलामध्ये क्रीडा सुविधा त्वरीत पूर्ण करणे, बांधकामास होणारा विलंब, अपुऱ्या सुविधा पुर्ण करण्यासाठी शासन निर्णयात निर्देशित बाबनिहाय रक्कम व DSR रेटच्या अनुषंगाने झालेली वाढ, स्थानिक प्रचलित खेळानुसार क्रीडा संकुलांसाठी केअर टेकर नियुक्ती करणे, विभागाच्या ठिकाणी जिल्हा क्रीडा संकुलांची बांधकामे करणे इ. बाबींचा अभ्यास करुन सदर समितीचा अहवाल शासनास सादर केला आहे. उपरोक्त अहवालामध्ये क्रीडा संकुलांच्या अनुदान मर्यादेत वाढ करण्याची बाब अंतर्भुत असून सदर अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात अनुदानासाठी मुल्याकंनात पात्र ठरलेल्या विनाअनुदानीत शाळांना अनुदान देऊन शिक्षकांना पूर्ण पगार देण्याबाबत

**(४७) ६२३५४ (२२-०८-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानासाठी मुल्यांकनात पात्र ठरलेल्या १३०० हून अधिक विनाअनुदानीत शाळांना अनुदान देऊन शिक्षकांना तातडीने पूर्ण पगार देण्याचे आदेश मा. मुख्यमंत्र्यानी माहे जून, २०१६ वा त्या दरम्यान दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या या आदेशानुसार विना अनुदानातील शाळांसाठी एकूण किती निधी उपलब्ध करून दिला आहे वा देण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (१५-११-२०१६) :** (१) व (२) अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयात राजगाव येथील व्यायामशाळेच्या अपूर्ण इमारतीसमोर जनावरांचे गोठे तसेच घराचे बांधकाम केल्याबाबत**

**(४८) ६३८०९ (२२-०८-२०१६). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गावपातळीवरील युवकांची शारीरिक प्रकृती सृदृढ रहावी, त्यांच्यात व्यायामाची गोडी निर्माण व्हावी, या हेतूने व्यायामशाळा विकास अनुदान, या योजनेतंर्गत व्यायामशाळा इमारत बांधकाम आणि त्यासाठी तब्बल १४ लाख रुपयांचे अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निधीतून वाशिम जिल्हयात राजगाव येथील व्यायामशाळेच्या अपूर्ण इमारतीसमोर कांहीनी जनावरांचे गोठे तर काहींनी घराचे बांधकाम केल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे व तद्नुसार कोटयावधी रुपयांचा निधी गिळंकृत करणा-या दोषी व्यक्तींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. सदर व्यायामशाळा संस्थेच्या मालकीच्या जागेत जनावरांचे गोठे व इतर बांधकामे नसून अन्य व्यक्तीच्या मालकी जागेत आहेत.
(३) प्रस्तुत प्रकरणी शासनाच्या वतीने तत्कालीन जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकमार्फत चौकशी केली असून चौकशी दरम्यान व्यायामशाळेच्या छताचे पत्रे नैसर्गिक (वादळ) आपत्तीमुळे उडून गेल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार संस्थेला व्यायामशाळेची त्वरीत दुरुस्ती करुन युवकांसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी, वाशिम यांच्यामार्फत दिनांक १३.०७.२०१६ रोजी अंतीम नोटीस देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परांडा भूम वाशी मतदार संघातील सर्व शाळांमध्ये मोफत पाठ्यपुस्तक योजनेंतर्गत मिळणारे पुस्तेक उपलब्ध करुन देणेबाबत**

**(४९) ६३९६२ (२२-०८-२०१६). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परांडा-भूम-वाशी विधानसभा मतदार संघात (जि.उस्मानाबाद) इयत्ता १ ली ते ८ वी पर्यतच्या सर्व अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके योजनेअंतर्गत पुस्तके व स्वाध्याय पुस्तिका देण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपूर्ण जिल्ह्यात एकूण १३,६५,२८७ पुस्तके व स्वाध्याय पुस्तकांची गरज असताना जिल्ह्यासाठी १०,६०,८८२ च पुस्तके उपलब्ध करुन देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची पुस्तके मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त पुस्तके उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-११-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मागणीनुसार पाठ्यपुस्तके उपलब्ध करुन देण्याचे निवेदन मा.विधानसभा सदस्य यांनी शासनास केले होते.

(४) उस्मानाबाद जिल्ह्याने मागणी केल्यानुसार सर्व पाठ्यपुस्तके व स्वाधायपुस्तिकांचा पुरवठा करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) नसल्याबाबत**

**(५०) ६४१६९ (२२-०८-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्याची निर्मिती होवून दोन वर्षाच्या कालावधी पूर्ण होवूनही जिल्ह्यात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) अस्तित्वात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयांचा सर्व कारभार डायटमार्फत चालत असल्यामुळे प्राचार्य, प्रशिक्षणार्थी, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी इत्यादींना बेलापूरपासून ३० कि.मी. अंतरावर असणाऱ्या रहाटोली येथे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने पालघर जिल्ह्यात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थे (डायट) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२४-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी चौकशी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. दि.१८ नोव्हेंबर, २०१४ च्या शासन निर्णयानुसार पालघर जिल्ह्यासाठी डायट स्थापनेकरीता प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मा.जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडे शासकीय जागा उपलब्ध होणेसाठी पाठपुरावा चालु असून, जागा उपलब्ध होताच या संदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
(४) पालघर मुख्यालयाच्या ठिकाणी शासकीय जागा उपलब्ध होत नसल्यामुळे डायट स्थापनेस विलंब होत आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.